प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. ३६७६ दि. ०८/१२/२२

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
### शिक्षण शुल्क समिती, मुंबई

(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)

कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com

## शिक्षण शुल्क समितीच्या दि.२५-११-२०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त

राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शै.वर्ष २०२१-२२ साठीचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीची बैठक दि.२५-११-२०२२ रोजी स.१०:३० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दालनात पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते:-

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २ | मा.श्री. बबन माळी, उपसचिव, वित्त विभाग (मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ३ | मा. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ४ | डॉ. माधुरी कागलकर, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ५ | श्री.व्ही.बी. शर्मा, सनदी लेखापाल | सदस्य |
| ६ | डॉ. महेश देशपांडे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा सहयोगी प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे | सदस्य |
| ७ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |

विशेष निमंत्रित म्हणून श्री. प्रताप लुबाळ, उपसचिव (मशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई, श्री. सुनिल सोनवणे, प्र.प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई तथा शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ, श्री. राजेंद्र ढाकणे, सहा. प्राध्यापक, शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मुंबई तथा शारिरीक शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ व श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल हे उपस्थित होते. तसेच डॉ. नलिनी पाटील - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन, पुणे यांनी बैठकीस उपस्थित राहू न शकत असल्याबाबत लेखी कळविले आहे.

Scanned with CamScanner

सदर बैठकीच्या सुरूवातीस सदस्य तथा सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी उपस्थितांचे स्वागत करून समितीच्या नवीन सदस्यांना शिक्षण शुल्क समितीच्या स्थापनेबाबत तसेच कार्यकक्षेबाबत माहिती दिली. त्यानंतर बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना सादर केली. २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये ४३३ महाविद्यालये समाविष्ट असल्याचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, (सीईटी सेल) मुंबई यांचेकडून माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यापैकी शिक्षण शुल्क समितीच्या कार्यकक्षेत येणाऱ्या महाविद्यालयांपैकी ३९३ महाविद्यालयांची शिक्षण शुल्क निश्चिती करण्यात आलेली आहे. उर्वरित महाविद्यालयांना शिक्षण शुल्क समितीकडे सन २०२१-२२ साठी विलंब शुल्कासह प्रस्ताव सादर करण्याची संधी देण्यात आली होती. एकुण १६ महाविद्यालयांनी सन २०२१-२२ करिता शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर केले आहेत. सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबाबत चर्चा व निर्णय झाले.

**विषय क्र.०१:- शिक्षण शुल्क समितीच्या दि.११.०४.२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत आढावा** :- सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई समितीच्या मागील बैठकीच्या इतिवृत्तातील कार्यपूर्तिबाबतचा अहवाल समितीस सादर केला.

**विषय क्र.०२:- राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या शै. वर्ष २०२१-२२ करिताच्या तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या १६ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

**परिशिष्ट अ** - बैठकीत ठेवलेल्या बी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण ०८ महाविद्यालयांपैकी २० टक्केपर्यंत वाढ असलेल्या ०१, मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ०७ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

**परिशिष्ट ब** - बैठकीत ठेवलेल्या एम.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण ०३महाविद्यालयांपैकी मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ०३ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

**परिशिष्ट क** - बैठकीत ठेवलेल्या बी.पी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण ०४ महाविद्यालयांपैकी २० टक्केपर्यंत वाढ असलेल्या ०१,मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ०३ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

**परिशिष्ट ड** - बैठकीत ठेवलेल्या एम.पी.एड. अभ्यासक्रमाच्या मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ०१ महाविद्यालयाच्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

ज्या महाविद्यालयांच्या शुल्कात मागील शुल्कापेक्षा जास्त घट झाली आहे, अशा महाविद्यालयांना शै.वर्ष २०२२-२३ करिता नवीन लेखापरिक्षण अहवालासह नव्याने प्रस्ताव सादर करण्याची मुभा राहील, अन्यथा सन २०२१-२२ चे शुल्क पुढील तीन वर्षांकरिता लागू राहील.

**विषय क्र.०३- दि.११.०४.२०२२ च्या बैठकीतील खर्च जास्त झालेल्या महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला खुलासा तसेच दि.११.०४.२०२२ च्या बैठकीत मंजूर करून दिलेल्या शुल्कासंदर्भात काही महाविद्यालयांकडून आक्षेप प्राप्त झाले आहेत, सदर प्राप्त झालेला खुलासा व आक्षेप समितीच्या विचारार्थ सादर.**

:- जयक्रांती कॉलेज ऑफ एज्यूकेशन, लातूर या महाविद्यालयाने सादर केलेला खर्च वाढीचा खुलासा हा समाधानकारक असून वेतन कॅश स्वरूपात न देता बँकेमार्फत देण्यात आलेले आहे. ते बँक विवरणपत्रात दिसून येत आहे. त्यामुळे सदर महाविद्यालयाचे शुल्क फेरनिश्चित करण्यात

Scanned with CamScanner

येत आहे.सदर महाविद्यालयाचे यापूर्वी दि.११-०४-२०२२ च्या बैठकीत मंजूर झालेले परिशिष्ट अ१ मधील प्रस्ताव क्र.१७५ चे शुल्क रद्द समजण्यात यावे. **(परिशिष्ट- अ १)**

तसेच इतर महाविद्यालयांकडून विनंतीपर आक्षेप प्राप्त झाले होते. त्यामध्ये समितीस आवश्यक असलेले अभिलेख जोडलेले नसल्यामुळे महाविद्यालयांची विनंती मान्य करता येत नाही.

**विषय क्र.०४-महाविद्यालयांच्या एन.सी.टी.ई. च्या सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमता आदेशानूसार शुल्क फेरनिश्चिती बाबत.**

:-श्री.सुरूपसिंग हिऱ्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर, जि. नंदूरबार या महाविद्यालयाने आक्षेपामध्ये १०० विद्यार्थी क्षमता दर्शविलेली यादी सादर केली व याच यादीच्या अनुषंगाने शुल्क मंजूर करण्याची विनंती केली होती. तथापि, **सदर यादी अद्ययावत नसून एन.सी.टी.ई.ने प्रमाणित/अधिकृत नसल्याचे एन.सी.टी.ई. ने कळविल्यामुळे** सदर महाविद्यालयाचे शुल्क २०० विद्यार्थी प्रवेश क्षमता गृहित धरून निश्चित करण्यात येत आहे. **(परिशिष्ट इ)** सदर महाविद्यालयाने शिक्षण शुल्क समितीस चूकीची माहिती सादर केल्यामुळे महाविद्यालयास कारणे दाखवा नोटीस देणे, शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीमध्ये चूकीची माहिती देणाऱ्या महाविद्यालयावर करावयाच्या कारवाईबाबत दंडाची तरतूद करण्यात यावी तसेच एन.सी.टी.ई. नवी दिल्ली यांना संबंधीत महाविद्यालयावर करावयाच्या कारवाईबाबत कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

सदर महाविद्यालयाचे यापूर्वी दि.११-०४-२०२२ च्या बैठकीत मंजूर झालेले परिशिष्ट अ२ मधील प्रस्ताव क्र.११२ चे शुल्क रद्द समजण्यात यावे.तसेच जादा आकारलेले शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्यात यावे.

ज्या महाविद्यालयांचे सन २०२१-२२ चे शुल्क निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी ६ महाविद्यालयांनी एन.सी.टी.ई.चे सुधारित विद्यार्थी क्षमतेचे आदेश समितीस सादर केले आहेत, त्यामुळे अशा ६ महाविद्यालयांचे प्रस्ताव नवीन विद्यार्थी संख्या गृहित धरून खर्च लेखापालांकडून फेरतपासणी करून फेरनिश्चित केलेल्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

**परिशिष्ट फ-महाविद्यालये ६**

सदर महाविद्यालयांचे यापूर्वी दि.११-०४-२०२२ च्या बैठकीत मंजूर झालेले परिशिष्ट अ३ मधील प्रस्ताव क्र.१९७, परिशिष्ट अ३ मधील प्रस्ताव क्र.१६९, परिशिष्ट अ मधील प्रस्ताव क्र.१५, परिशिष्ट अ३ मधील प्रस्ताव क्र.२१६ चे शुल्क तसेच दि.०५.०१.२०२२ च्या बैठकीत मंजूर झालेले परिशिष्ट अ मधील प्रस्ताव क्र.८३ चे शुल्क, परिशिष्ट अ मधील प्रस्ताव क्र.१२५ चे शुल्क रद्द समजण्यात यावे.

**विषय क्र.०५- अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती शुल्क मंजूरीबाबत मागील बैठकीतील मुद्दा क्र. ०७ अन्वये झालेल्या निर्णयानूसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा.**

एन.सी.टी.ई. च्या ०९-११-२०१६ च्या पत्रान्वये अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या शुल्क निश्चितीबाबत खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

As such, while the Minority Educational Institutions (MEIs) would be free to fix their own fee structure, the committee would have a jurisdiction

Scanned with CamScanner

over them to ensure that fee charged by MEI is not exhorbitant and there is no profiteering involved therein.

अल्पसंख्यांक महाविद्यालयांना त्यांचे शुल्क निश्चिती करण्याचे जरी अधिकार असले तरी एन.सी.टी.ई. च्या दि.०९.११.२०१६ च्या पत्रान्वये सदरचे शुल्क हे अवाजवी व नफेखोरी करणारे नाहीत, याची खात्री करण्याची बाब ही समितीच्या कार्यकक्षेत येते. या पत्राच्या अनुषंगाने दि.११.०४.२०२२ च्या बैठकीत अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत घेण्यात आलेल्या निर्णयानूसार १२८ महाविद्यालयांच्या बाबतीत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

अ. ज्या अल्पसंख्यांक महाविद्यालयांनी अंतिम मंजूर शुल्कात २० टक्के पेक्षा कमी वाढ केली, अशा ६५ महाविद्यालयांच्या शुल्कास महाडीबीटी पोर्टलवर मंजूरी देण्यात आली.त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. यापैकी ज्या महाविद्यालयांनी अंतिम मंजूर शुल्कात वाढ न करता सन २०२१-२२ मध्ये महाडीबीटी पोर्टलवर मंजूर करून घेतले, अशा महाविद्यालयांनी सन २०२२-२३ करिता नव्याने प्रस्ताव सादर करून समितीकडून शुल्क पडताळणी (varification)करून घ्यावी.

ब. ज्या अल्पसंख्यांक महाविद्यालयांनी अंतिम मंजूर शुल्कात २० टक्के पेक्षा जास्त वाढ केली होती, अशा महाविद्यालयांकडून लेखापरिक्षण अहवाल, विद्यार्थी संख्या इत्यादी अभिलेख मागविण्यात आले होते. या कार्यालयाकडे ४० महाविद्यालयांनी अभिलेख सादर केले होते, यापैकी ३५ महाविद्यालयांच्या खर्च लेखापाल यांनी पडताळणी करून आलेल्या शुल्कास महाडीबीटी पोर्टलवर मंजूरी देण्यात आली. **(महाविद्यालयांची यादी परिशिष्ट-क १,क २,क ३,क ४,क ५)**

तसेच उपरोक्त मुद्दा क्र. अ (अंतिम मंजूर शुल्कात वाढ न केलेली महाविद्यालये वगळता) आणि ब मधील महाविद्यालयांना पोर्टलवर मंजूर करून दिलेले शुल्कच विद्यार्थ्यांकडून आकारणी करण्यात येईल, असे प्रतिज्ञापत्र संस्थेकडून/प्राचार्यांकडून घ्यावे, जी महाविद्यालये असे प्रतिज्ञापत्र लिहून देणार नाहीत अशा महाविद्यालयांची यादी प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना कळवून सदर महाविद्यालयांचे प्रवेश थांबविणेबाबत विनंती करण्यात यावी, असा निर्णय झाला.

उर्वरित ३ महाविद्यालयांनी खर्च लेखापाल यांनी परिगणना केलेले शुल्क महाडीबीटी पोर्टलवर सादर न केल्यामुळे ती प्रलंबित आहेत, अशा महाविद्यालयांना परत एकदा महाडीबीटी पोर्टलवर शुल्क भरणेबाबत कळवावे, अन्यथा अशा महाविद्यालयांची यादी एन.सी.टी.ई. ला पुढील कार्यवाहीस्तव पाठवावी तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना कळवून सदर महाविद्यालयांचे प्रवेश थांबविणेबाबत विनंती करण्यात यावी, असा निर्णय झाला. उर्वरित २ महाविद्यालये - अशोका अध्यापक महाविद्यालयातील बी.ए.बी. एड/बी.एस्सी. बी.एड या दोन अभ्यासक्रमांच्या शुल्काबाबत समितीत चर्चा झाली. सदर महाविद्यालयास एन.सी.टी.ई.ची बी.ए./बी.एस्सी. बी.एड अशी एकच मान्यता असल्यामुळे व सदर अभ्यासक्रमासाठी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस एन.सी.टी.ई.ची मान्यता असल्याने त्यानूसार बी.ए/बी.एस्सी.बी.एड यासाठी १०० विद्यार्थी संख्येची मान्यता एकत्रितपणे विचारात घेवून त्यानूसार शुल्क पडताळणी करावी व त्यानूसार येणारे शुल्क महाडीबीटीवर मान्यतेसाठी विचारात घेण्यात यावे. असा निर्णय झाला. उर्वरित ज्या २३ महाविद्यालयांनी अद्यापही

Scanned with CamScanner

महाडीबीटी पोर्टलवर शुल्क मंजूरीसाठी पाठविलेले नाही, अशी महाविद्यालये विद्यार्थ्यांना किती शुल्क आकारतात याबाबत ची माहिती विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून प्राप्त करून घ्यावी, असा निर्णय घेण्यात आला.

सन २०२१-२२ ला ज्या महाविद्यालयांनी मागील शुल्कात २० टक्के पर्यंत वाढ केली अथवा खर्चाचे अभिलेख पाठवून शुल्क पडताळणी करून महाडीबीटी पोर्टलवर मंजूर करून घेतले आहे अशा महाविद्यालयांना पुढील ३ वर्षापर्यंत सदरचे शुल्क लागू राहील.

**विषय क्र.०६-जी महाविद्यालये सन २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियमध्ये समाविष्ट होती तथापि वेळोवेळी मुदतवाढ देवूनसुध्दा सन २०२१-२२ च्या शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर केलेले नाहीत, अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती शुल्काबाबत विचारविनिमय करणे तसेच अशा महाविद्यालयांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

:-सन २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट असणाऱ्या राज्यातील महाविद्यालयांना प्रस्ताव सादर करण्याकरिता वारंवार मुदत देवूनसुध्दा त्यांनी सन २०२१-२२ करिता प्रस्ताव सादर केले नाहीत, अशा महाविद्यालयांचे महाडीबीटी पोर्टलवर शुल्क मंजूर करण्यात येवू नये, असा निर्णय झाला.

तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेकडून विद्यार्थ्यांच्या प्रवेश निश्चिती वेळेस शिष्यवृत्तीकरिता प्रात्र असल्याचा/नसल्याचा ई-मेल पाठविणेबाबत प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना कळविण्यात यावे. विहीत मुदतीत शुल्क निश्चितीचे प्रस्ताव समितीस सादर न करणाऱ्या महाविद्यालयांवर करण्यात येणाऱ्या दंडाबाबत तरतूद समितीच्या नियमावलीत करून घ्यावी तसेच सदर महाविद्यालयांची नावे एन.सी.टी.ई.ला कळविण्यात यावी, असा निर्णय झाला.

**विषय क्र.०७- शुल्क नियामक प्राधिकरणाप्रमाणे शुल्क निश्चितीचे प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात मागविण्यासाठीच्या पोर्टलबाबत.**

शिक्षण शुल्क समितीच्या दि.०५.०१.२०२२ व दि.११.०४.२०२२ च्या बैठकीतील निर्णयान्वये शुल्क नियामक प्राधिकरण, बांद्रा येथे प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात मागविण्याबाबत काम करणाऱ्या सेवापुरवठादाराकडून या कार्यालयास सॉफ्टवेअर उपलब्ध करून घेण्यास तसेच त्यावर होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात आलेला आहे. सदरचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करून फेब्रुवारी २०२३ पर्यंत प्रस्ताव ऑनलाईन मागविण्यासंदर्भात ऑनलाईन पोर्टल तयार करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र.०८- डॉ. गुरसळ समितीने सूचविलेल्या शिफारशींनूसार जमा करण्यात येणाऱ्या प्रक्रिया शुल्काबाबत.**

शिक्षण शुल्क समितीच्या दि.१०.०७.२०१९ च्या बैठकीन्वये दि.०४.०६.२०१९ च्या डॉ.गुरसळ उपसमितीने सूचविलेल्या शिफारशींना मंजूरी देण्यात आली होती. डॉ.गुरसळ समितीच्या शिफारशींनूसार शिक्षण शुल्क समितीने सन २०१९-२० साठी शुल्क निश्चितीकरिता मागविलेल्या प्रस्तावांसोबत महाविद्यालयाच्या एकूण खर्चाच्या ०.५ टक्के प्रमाणे प्रक्रिया शुल्क जमा केले होते. सदर प्रक्रिया शुल्क जमा करणेसाठी बँकेमध्ये बचत खाते उघडण्यासाठी परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. परंतू उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

Scanned with CamScanner

मंत्रालय यांचे शासनपत्र क्र.संकीर्ण-२०१९(१४८/१९)/मशि-३ दि.२२.०१.२०२० अन्वये, सदर प्रस्तावावर वित्त विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय कळविले होते.

"जमेची रक्कम एकत्रीत निधीत जमा करावी व खर्चासाठी रक्कम अर्थसंकल्पीत करून घ्यावी" या अभिप्रायास अनुसरून आवश्यक उचित कार्यवाही करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. महाविद्यालयांकडून शुल्क निश्चितीचा प्रस्ताव स्विकारताना सदरची एकूण खर्चाच्या ०.५ टक्के प्रमाणे प्रक्रिया शुल्काची रक्कम जमा करणेबाबतचा पूर्वलक्षीप्रभावाने शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून निर्गमित करणेबाबत विभागास प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले

**विषय क्र.०९.-महाविद्यालयांच्या विकास शुल्काबाबत.**

शिक्षण शुल्क समितीची दि.०५.०१.२०२२ व दि.११.०४.२०२२ च्या बैटकीतील निर्णयानूसार महाविद्यालयांकडून विकास खाते व विकास योजना मागविण्यात आल्या होत्या. एकूण ११३ महाविद्यालयांकडून उपरोक्त अभिलेख प्राप्त झालेले आहेत. तरी या ११३ महाविद्यालयांना सन २०२२-२३ पासून समितीने मंजूर करून दिलेल्या शिक्षण शुल्कावर १० टक्के विकास शुल्क लागू राहील. **(परिशिष्ट अ४)** पुढील वेळेस प्रस्ताव सादर करताना उपरोक्त महाविद्यालयांना विकास शुल्काचा शैक्षणिक वर्षात विकास योजनांवर खर्च केल्याबाबतचा स्वतंत्र ताळमेळ (हिशोब) सादर करणे बंधनकारक राहील, असा निर्णय झाला. उर्वरित महाविद्यालयांनी परस्पर विकास शुल्क आकारू नये.

**विषय क्र.१०. - अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

**१०.१** खानदेश कॉलेज ऑफ एज्यूकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय(बी.एड.)जळगांव व प्रोग्रेसिव्ह एज्यूकेशन सोसायटीचे बी.एड कॉलेज, शिवाजीनगर, पुणे या महाविद्यालयात कोविडमुळे वेतनामध्ये कपात करण्यात आली होती त्यामुळे खर्चात व शुल्कात घट झाली, सन २०२१-२२ मध्ये खर्चात वाढ झाल्यामुळे महाविद्यालयांनी सन २०२२-२३ करिता नव्याने प्रस्ताव सादर करण्याची केलेली विनंती समितीकडून मान्य करण्यात आली.

**१०.२** महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चंद्रपूर, श्री. राजाभाऊ जाचक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वर्धा, महिला बहुउद्देशिय शिक्षण संस्थेचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पिंपरी(मेघे),वर्धा आणि स्व. माधवराव तिडके शारिरीक शिक्षण महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर ही महाविद्यालये एनसीटीई ने मान्यता काढून घेतल्यामुळे/विद्यापीठाने संलग्निकरण नाकारल्यामुळे मागील ३ ते ५ वर्षापासून बंद होती. तथापि,सन २०२१-२२ पासून उपरोक्त मान्यता मिळाल्यामुळे प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट झाली आहेत. अशा महाविद्यालयांना सन २०२१-२२ करिता महाडीबीटी पोर्टलवर शासकीय महाविद्यालयातील प्रचलित दरानूसार शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी रू.१२,६०६/-प्रतिवर्ष एवढे शिक्षण शुल्क आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी रू.३०००/-/-प्रतिवर्ष एवढे शिक्षण शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. सन २०२२-२३ करिता उपरोक्त महाविद्यालयांनी शुल्क निश्चितीचा प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील.

**१०.३** गायत्री कॉलेज ऑफ एज्युकेशन, देवळाली प्रवरा, राहुरी, जि.अहमदनगर या महाविद्यालयाने एन.सी.टी.ई.चे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमता असलेले सुधारित पत्र सादर केलेले आहे. त्यामुळे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमता गृहित धरून शुल्क फेरनिश्चती करण्यास समितीने मान्यता दिली.**(परिशिष्ठ-फ)**

Scanned with CamScanner

१०.४ ज्या महाविद्यालयांनी सन २०२१-२२ ला शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर केले नव्हते अशा महाविद्यालयांकडून सन २०२२-२३ करिता प्रस्ताव मागविणेबाबत समितीने मान्यता दिली.

१०.५शिक्षण शुल्क समितीच्या नामनिर्देशित सदस्यांचा बैठक भत्ता व प्रवास भत्त्याबाबत समितीच्या पुढील बैठकीपूर्वी निर्णय होणेबाबत निर्देश देण्यात आले.

१०.६ राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे Academic Audit करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत राज्यातील सर्व विद्यापीठांना शिक्षण शुल्क समितीमार्फत कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत आक्षेप असल्यास सबळ अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे सादर करावेत. समितीच्या पुढील बैठकीत सदर आक्षेप सादर करण्यात येतील.

सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांनी उपस्थितांचे आभार मानले व सदर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्र.संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

Scanned with CamScanner